पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ८**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २२/५/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १४५**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चा माहे एप्रिल २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/४३१ दि.१०/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १४६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/४/२०१८ ते दि.३०/४/२०१८ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/४५१ दि.११/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १४७**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) चा माहे मार्च २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/४४२ दि. ५/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १४८**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) चा माहे एप्रिल २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/४४३ दि. १५/५/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १४९**

मा.सुशिल मेंगडे यांचे दि. १०/५/२०१८ चे पत्र.

वारजे शिवणे ते खराडी या डी.पी.रस्त्यातील राजाराम पुल ते वारजे पर्यंतच्या डी.पी. रस्त्याच्या विकसनाकरीता आवश्यक मिळकतीतील क्षेत्रांचे ताबे घेण्याकरिता भुसंपादन कायदयान्वयेची कार्यवाही तातडीने सुरू करावी.

**विषय क्र. १५०**

मा.सौ.सुलोचना कोंढरे यांचे दि. १४/५/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१७ ब (रास्ता पेठ–रविवार पेठ) मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८–१९ चे अंदाजपत्रक, | | |
| १)सीई२०अे१२६२/एसए१५–१८७५, पान क्र. १९९, अ.क्र.३७५, प्रभाग क्र.१७ ब गणेश पेठ घरांक क्र. १६८ ते १७४ परिसरातील रस्ते काँक्रीटीकरण करणे | २० लाख | --- |
| २)सीई२०अे१२६२/एसए१५–१८७६, पान क्र. १९९, अ.क्र.३७६, प्रभाग क्र.१७ ब रास्ता पेठ घरांक क्र. ७९ येथील उर्वरित रस्ते काँक्रीटीकरण करणे | २० लाख | --- |
| ३)सीई२०अे१२६२/एसए१५–१८६९, पान क्र. १९९, अ.क्र.३६९, प्रभाग क्र.१७ ब गणेश पेठ नाडे गल्ली परिसरातील रस्ते काँक्रीटीकरण करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १)प्रभाग क्र.१७ ब मधील रविवार पेठ येथील म.न.पा.शाळा मौलाना अब्दुल कलाम या ठिकाणी शाळेला सिमाभिंत बांधणे | --- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| २)प्रभाग क्र.१७ ब मधील रविवार पेठ येथील म.न.पा.शाळा मौलाना अब्दुल कलाम मध्ये रंगरंगोटी व इतर विकास कामे करणे | --- | ५ लाख |
| ३)प्रभाग क्र.१७ ब मधील रविवार पेठ, गणेश पेठ, रास्ता पेठ या परिसरातील जेटींग मशिनच्या सहाय्याने गाळ काढणे | --- | १० लाख |
| ४)प्रभाग क्र.१७ ब मधील भवानी पेठ, नाना पेठ, बुधवार पेठ परिसरात जेटींग मशिनच्या सहाय्याने गाळ काढणे | --- | १० लाख |
| ५)प्रभाग क्र.१७ ब मधील विविध ठिकाणचे चेंबर दुरुस्ती करणे व नविन ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| ६)प्रभाग क्र.१७ ब मधील गणेश पेठ येथील बागेत ओपन जिम करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. १५१**

मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. १६/५/२०१८ चे पत्र.

वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण करणेबाबत

वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गाचे काम सध्या गतीने सुरु आहे. हा मेट्रो मार्ग वनाज ते चांदणी चौक पर्यंत विस्तारीत करण्यात यावा. चांदणी चौक पर्यंत मेट्रो मार्ग विस्तारीत करण्याचे कारण :-

१) पुणे शहराचे पश्चिम द्वार असणारे चांदणी चौक हे मध्यवर्ती ठिकाण आहे.

२) चांदणी चौक येथे मुंबई, सातारा, कोल्हापूर, कोकण अशा अनेक ठिकाणावरुन प्रवासी सतत प्रवास करीत असतात.

३) चांदणी चौक येथून हिंजवडी आय.टी.पार्क, कोथरुड, मुळशी, पाषाण व वारजे परिसरातील नागरिकांस प्रवास करणे सोयीस्कर आहे.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १५२**

बांधकाम विभागाकडील बालेवाडी, सदाशिव पेठ, घोरपडी, शुक्रवार पेठ, बाणेर, रविवार पेठ, पाषाण, मंगळवार पेठ, सोमवार पेठ विभागाच्या सन २०१७-१८ मध्ये प्रस्ताव मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रापैकी तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्ताव प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/३४२ दि. १४/५/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ०२ सन २०१८-२०१९ चा विचारासाठी.

**विषय क्र. १५३**

आरोग्य प्रमुख यांचे नियंत्रणाखालील अन्न परवाना विभागाकडील कुत्रा बंदोबस्तासाठी लागणाऱ्या सेवकवर्गाच्या खर्चावर शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची व त्या संदर्भात अनुदान पोच रजिस्टर व तद्नुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/३४७ दि. १५/५/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ०३ सन २०१८-२०१९ चा विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. १५४**

वारजे पंपींग व खडकवासला रॉ वॉटर पंपींग येथे २२ के.व्ही. व्ही.सी.बी. पॅनल पुरविणे बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्यु सोलर इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,८८६=०६ पेक्षा ३.१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९६,८९,८८९=५९ रक्कमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापू/६८ दि.१६/५/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १५५**

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३० अ मध्ये कचरा वाहतुक करणेकरीता कॉम्पॅक्टर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे. हायवा (इंडिया) प्रा. लि., नवी मुंबई या उत्पादक कंपनीकडून १४ क्यु.मी. क्षमतेचा कॉम्पॅक्टर बांधणी व चासीजसह खरेदी करणे कामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/२७ दि.२०/४/२०१८ चे पत्र.

१. पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३० अ मध्ये कचरा वाहतुक करणेकरीता कॉम्पॅक्टर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे. हायवा (इंडिया) प्रा. लि., नवी मुंबई या उत्पादक कंपनीकडून १४ क्यु.मी. क्षमतेचा कॉम्पॅक्टर चासीजसह खरेदी कामी रक्कम रु.३१,७५,०००/- पर्यंत जीएसटी व इतर सर्व खर्चासह त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस.

२. पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३० अ मध्ये कचरा वाहतुक करणेकरीता कॉम्पॅक्टर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे. हायवा (इंडिया) प्रा. लि., नवी मुंबई या उत्पादक कंपनीकडून १४ क्यु.मी. क्षमतेचा कॉम्पॅक्टर चासीजसह खरेदी कामी रक्कम रु.३१,७५,०००/- पर्यंत जीएसटी व इतर सर्व खर्चासह त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणे कामी होणारे देयक मे. हायवा (इंडिया) प्रा. लि., नवी मुंबई यांचे अटी व शर्तीनुसार चासीजचे देयक मे.हायवा (इंडिया) प्रा. लि., नवी मुंबई यांचेकडून चासीजचा मा.महापालिका आयुक्त यांचे नावे प्रोफॉर्मा इन्व्हाइस प्राप्त झालेनंतर चासीज उत्पादक कंपनी अथवा त्यांचे अधिकृत विक्रेते यांचे नावे ऑनलाईन पध्दतीने ईसीएस/आरटीजीएस याद्वारे आदा करणेस व कॉम्पॅक्टर बांधणीकामी प्राप्त होणारे देयक मे.हायवा (इंडिया) प्रा. लि., नवी मुंबई यांना या वाहन उत्पादक कंपनीचे नावे ऑनलाईन पध्दतीने ईसीएस/आरटीजीएस याद्वारे आदा करणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.३/५/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५६**

कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत महापालिका सेवकांना एक अपत्यावर कुटूंब नियोजन केल्या प्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी देणे ऐवजी रोख रक्कम स्वरुपात एकदाच बक्षिस (One time reward) देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/१०४७ दि.२०/२/२०१८ चे पत्र.

१)मा.महापालिका सभेचे ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ अन्वये प्राप्त मंजुरीनुसार संबंधित महानगरपालिका अधिकारी/सेवकांना देण्यात आलेल्या वेतनवाढी रद्द करणेस, त्यानुसार वेतन फेरनिश्चितीकरण व आवश्यक ती कार्यवाही करणेस

२) पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडे मा.स्थायी समितीचे मंजुरीने लाडकी लेक दत्तक योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये एका मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास र.रुपये ५० हजार पर्यंत राष्ट्रीयकृत बँकेत मुलीच्या नावे गुंतविण्यात येतात. त्या योजनेप्रमाणे कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत पुणे महापालिका अधिकारी/सेवकांनी एका अपत्यावर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याप्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी देणेऐवजी, संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना र.रुपये ५० हजार एकदाच बक्षिस (One time reward) स्वरुपात दि. १८/१२/१९९८ पासून मा.महापालिका सभा ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ चे मंजुरीमधील अट क्र. २ व ४ च्या अधीन देणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.८/५/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५७**

टेंडर क्रमांक २/२०१७ ने कै.मदनदादा मुंडे मार्केट येथील ४० गाळे ५ वर्षे मुदतीसाठी वाटप करण्याकरिता निविदा क्रमांक २/२०१७ ने दोन पाकिट पध्दतीने दिनांक २४/११/२०१७ जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार एकूण २९ निविदा प्राप्त झाल्या असून, त्यापैकी २५ निविदा पात्र झालेल्या आहेत. या २५ पात्र निविदाधारकांपैकी गाळा क्र. ३४ व ४२ साठी २ निविदा प्राप्त झाल्या होत्या अशा प्रकारे २३ गाळयांसाठी २५ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

उपरोक्त नमुद गाळा क्र. ३४ व ४२ साठी मुळ गाळाधारकाने निविदेत असलेले अधिकतम रक्कम देण्याचे कबुल केल्याने त्यांची शिफारस करण्यात आली आहे.

सबब एकूण २३ गाळयांचा तपशील खालीलप्रमाणे.

त्याप्रमाणे पात्र अर्जदारांची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देत आहोत.

| अ. क्र. | अर्जदारांचे नाव | गाळा क्रमांक | मनपाने निश्चित केलेली रक्कम | अर्जदारांनी देवू केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | फिरोज दिलावर बागवान ,अशरफी फ्रुट कंपनी | १० | ८८९/- | १०००/- |
| २ | राजेश रंगनाथ भोसले | २७ | ८८९/- | ९०१/- |
| ३ | राजश्री संजय जिमन | २८ | ८८९/- | ९०३/- |
| ४ | मयुर विनोद गादीया | २९ | ८८९/- | ८९८/- |
| ५ | अनिल शत्रुघ्न परबत | ३१ | ८८९/- | ८९८/- |
| ६ | सिध्दांत संतोष जाधव | ३२ | ८८९/- | ९०५/- |
| ७ | बालाजी संभाजी माने | ३३ | ८८९/- | ८९९/- |
| ८ | कैलास विठ्ठल भिंगारे | ३४ | ८८९/- | ९०५/- |
| ९ | उमेश अ. खत्री | ३५ | ८८९/- | ८९७/- |
| १० | मयुरेश दिपक सातपुते | ३६ | ८८९/- | ८९५/- |
| ११ | विकास प्रकाश कातकर | ३७ | ८८९/- | ९०२/- |
| १२ | राम नारायण वाक | ३८ | ८८९/- | ८९८/- |
| १३ | अशोक रामेश्वर दळवे | ३९ | ८८९/- | ९०३/- |
| १४ | योगेश रुपसिंह चौहान | ४० | ८८९/- | ९०१/- |
| १५ | रघुनाथ रामशंकर यादव | ४२ | ८८९/- | ९०२/- |
| १६ | राजेंद्र किसन दळवी | ४३ | ८८९/- | ८९६/- |
| १७ | नामदेव प्रल्हाद दरगुडे | ४४ | ८८९/- | ८९५/- |
| १८ | अर्चना कैलास निवेकर | ४५ | ८८९/- | ८९८/- |
| १९ | आकाश रामदास निकम | ४६ | ८८९/- | ९०१/- |
| २० | चंद्रकांत मल्हारराव कोंडे | ४७ | ८८९/- | ८९२/- |
| २१ | राहुल सुखदेव पवार | ४८ | ८८९/- | ८९३/- |
| २२ | अंकिता दत्तात्रय काशीद | ४९ | ८८९/- | ८९०/- |
| २३ | सोनल राजेंद्र कोंडे | ५० | ८८९/- | ८९८/- |

तरी मिळकत वाटप नियमावली नुसार कै.मदनदादा मुंडे मार्केट येथील गाळे उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे निविदेमधील अटी व शर्तीनुसार ५ वर्षे मुदतीसाठी वाटप करणेस व तीन वर्षानी १२% भाडेवाढ करणेस त्यांचे बरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मंडई वि./५४ दि.७/५/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१५/५/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५८**

अंशदायी वैद्यकीय सहाय योजना व शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेअंतर्गत, पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्सकडील वैद्यकीय बीलांचे परताव्यासाठी आणि योजनेच्या सभासदांकडील वैयक्तिक वैद्यकीय बीलांचे परताव्यासाठी, प्रचलित पध्दतीनुसार सदयस्थितीत उपयोगात येणाऱ्या, सी.जी.एच.एस. दरपत्रकात अंतर्भूत सर्व वैद्यकीय उपचार व तपासण्यांचे दरांमध्ये ५०% वाढ करून पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्स प्रशासनास व योजनेच्या सभासदांस वैद्यकीय बीलांची प्रतिपूर्ती करणेस तसेच वैद्यकीय सहाय योजनेच्या सभासदांनी, पुणे म.न.पा. दवाखाने/रुग्णालये येथे उपलब्ध नसलेल्या लसी, बाहेरील औषध दुकानांमधून अथवा खाजगी रुग्णालयांतून खरेदी केल्यास आणि संबंधित लसींचे मूळ कॅश मेमो/रीसीट, प्रचलित धोरणानुसार इतर आवश्यक कागदपत्रांसहित प्रतिपूर्तीसाठी वैद्यकीय सहाय योजना कार्यालयाकडे सादर केल्यास, लसींच्या बीलांची प्रतिपूर्ती संबंधितांस नियमानुसार अनुज्ञेय करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५२ दि.७/५/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१५/५/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५९**

प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्ल्टंट पार्टी कन्स्ल्टंट म्हणुन पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामा करीता मे.क्लीन वॉटर सोल्युशन यांचे नाव मा.स्थायी समिती ठराव क्र. १६०४ दि. ११/१२/२०१२ अन्वये मान्य असलेल्या सल्लागार यांचे यादीत तज्ञ सल्लागारांच्या पॅनेल वर्ग (I)(प्रोजेक्ट र.रुपये ०.० ते ५.०० कोटीपर्यंत) समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५९ दि.८/५/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१५/५/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १६०**

पुणे मेट्रो प्रकल्प टप्पा क्र. १, मार्गिका क्र. २ "वनाज ते रामवाडी" या मार्गिकेच्या आराखडयामध्ये नळस्टॉप चौकात फ्लायओव्हर प्रस्तावित करुन त्याचा आराखडा डिझाईन व बांधकाम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचेकडून बांधण्यात येणाऱ्या दुमजली पुलाचे एकूण खर्चापैकी पहिल्या मजल्यापर्यंत वाहनांचे उड्डाणपुलासाठी येणारा खर्च र.रु.३५,२५,१३,२३६/- (४.५% सुपरव्हीजन चार्जेससहीत) सदरची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/६६ दि.१४/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १६१**

पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडील प्राथमिक/माध्यमिक शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनींना विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तू स्वरुपात मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतरण रोख स्वरुपात करणेकामी विविध साहित्यांचे निश्चित करण्यात आलेल्या दर मान्यतेस, सदर मान्य दरानुसार होणारी रक्कम विद्यार्थ्यांच्या थेट बँक खाती जमा करणेस व गणवेश रंगसंगती (विद्यार्थी - पांढरा व खाकी, विद्यार्थीनी - निळा पांढरा सलवार कुर्ता व ओढणी/जॅकेट याप्रमाणे) बदलणेकामी तसेच सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षाकरीता मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार शालेय साहित्य व साहित्यांचे दरांमध्ये कोणतेही बदल करावयाचे झालेस त्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/शिक्षण वि./६७ दि.१५/५/२०१८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**